दि. 10.10.2026

प्रेसनोट

पोलीस उपमहानिरीक्षक यांच्या पथकाच्या धडाकेबाज कारवाया

नांदेडमध्ये वाळू, परभणीत मटका, तर लातूरमध्ये गुटख्याविरुद्ध कारवाई

20 इसमांविरुद्ध कारवाई; 4 कोटी 23 लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त

नांदेड परिक्षेत्रातील अवैध व्यवसायांना पायबंद घालण्यासाठी पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी आपल्याकडील पोलीस पथक परभणी, नांदेड व लातूर जिल्ह्यात रवाना केले होते.

सदर पथकाने, दिनांक 09.10.2026 रोजी परभणी जिल्ह्यातील गंगाखेड पोलीस ठाणे हद्दीत राधिका लॉज व विजयप्रभा बार यांच्या शेजारील पत्र्यांचे दोन शटरमध्ये सुरू असलेल्या मटका बुकींवर कारवाई करत, त्या ठिकाणाहून 21,600/-रुपयांची रोकड व 71,000/- रुपयांचे (8) मोबाईल असा एकूण 92,600/- रुपयांचा मुद्दमाल जप्त केला असून, नमूद प्रकरणात एकूण (9) इसमांविरुध्द कारवाई करुन, त्यांचेविरुध्द गंगाखेड पोलीस ठाणे येथे गुरनं 665/2026 कलम 12 (अ) महाराष्ट्र जुगार कायदयान्वये गुन्हा नोंदविला आहे.

नांदेड जिल्हयात अवैध रेती उत्खनन व वाहतुकीविरुद्ध काही तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. सदर अवैध रेती विरुद्ध कारवाई करण्यासाठी पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी पथकास मुदखेड पोलीस ठाणे हद्दीतील मौजे महाटी शिवारात पाठविले होते.

सदर पथकाने, रात्री 23.00 वाजता मौजे महाटी शिवारातील वाळू धक्क्यावर कारवाई केली असता, सदर ठिकाणी इंजिन बोटच्या सहाय्याने नदी पात्रातून वाळू उपसा होत असल्याचे व सदर वाळू एका फायबर बोटीतून नदीकिनारी आणली जात असल्याचे निदर्शनास आले. सदर कारवाईत पथकाने, (5) हायवा, एक टिप्पर, (6) JCB मशीन व नदीपात्रातून बाहेर काढून ठेवलेली (65) ब्रास वाळू, असा एकूण 4,13,25,000/- रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

नमूद प्रकरणात (10) इसमांविरुध्द कारवाई करुन, त्यांचेविरुध्द मुदखेड पोलीस ठाणे येथे गुरनं 192/2026 कलम 303 (2), 3(5) भारतीय न्याय संहिता, कलम 48 (7), 48 (8) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमा अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

तसेच, आज दिनांक 10.10.2026 रोजी लातूर जिल्हयातील अहमदपुर पोलीस ठाण्याच्या हद्दीत काळेगांव मदरसा जवळ टोयोटा कंपनीच्या इटिओस कारमध्ये विक्री करण्यासाठी घेवून जात असलेला 4,57,500/- रुपयांचा गुटखा व टोयोटा कंपनीची इटिओस कार असा 9,57,500/- रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी माधव मोरे, रा. जांब ता. मुखेड, जिल्हा नांदेड याच्याविरुद्ध अहमदपुर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

उपरोक्त तिन्हीही कारवायांत, पथकाने एकूण (20) इसमांकडून 21,600/- रुपयांची रोकड, (8) मोबाईल, (5) हायवा, एक टिप्पर, (6) JCB मशीन, 65 ब्रास वाळू, एक कार व गुटखा असा एकूण 4,23,75,100/- रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

सदर कारवाईत पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांचेसह पोहेकॉ/ प्रदिप खानसोळे, पोहेकॉ/ गणेश राठोड, पोहेकॉ/ संदिप वाघाडे व पोहेकॉ/ गजानन डवरे यांनी सहभाग घेतला. पथकाच्या उल्लेखनीय कामगिरीबाबत पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी पथकातील अधिकारी व अंमलदारांचे अभिनंदन करून त्यांना प्रोत्साहित केले आहे.

' खबर ' हेल्पलाइन वरुन माहिती द्या : अवैध व्यवसायांची माहिती थेट पोलीसांना पोहोचविता यावी, या दृष्टिकोनातून, पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयाने 91 50 100 100 हा मोबाईल क्रमांक असलेली 'खबर' नावाची हेल्पलाइन सुरू केली असून, सदर हेल्पलाइन वरून नागरिकांनी आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयापर्यंत पोहचवावी, असे आवाहन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उप महानिरीक्षक श्री. शहाजी उमाप यांनी केले आहे.

पोलीस उप महानिरीक्षक कार्यालय,
नांदेड परिक्षेत्र, नांदेड